02-07-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 7/1/2025 10:50 PM Page 1



एसजीपीडीए कचरा व्यवस्थापनावर नगरपरिषदेची नाराजी पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



बर्मिंगहॅम कसोटीपूर्वी भारतात बदलाचे संकेत! पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २ जुलै २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 300 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 2 July 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### मानवी तस्करी प्रकरणात वॉन्टेड गोव्यात अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** पश्चिम बंगालमधील मानवी तस्करी प्रकरणात फरार असलेल्या एका आरोपीला ओल्ड गोवा पोलिस आणि कालिम्पोंग अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट यांच्या संयुक्त कारवाईत रविवारी अटक करण्यात आली. आरोपी पिंकू रॉय (मूळचा आसामचा) याला ओल्ड गोवा येथील एका रेस्टॉरंटमधून ताब्यात घेण्यात आले.

प्रकरणाची नोंद कालिम्पोंग जिल्ह्यातील डॉ. ग्रॅहम्स परिसरातील एका महिलेच्या तक्रारीवरून करण्यात आली आहे. तिने आरोप केला की, रॉयने २०२३ मध्ये बेंगळुरूमध्ये तिच्याशी करारबद्ध विवाह केला होता. त्यानंतर हे जोडपे कालिम्पोंगला गेले, जिथे साध्या विवाह करारावर स्वाक्षरी करण्यात आली. नंतर ते केरळ आणि नंतर कर्नाटकात गेले.

तक्रारीनुसार, ६ ऑगस्ट २०२४ रोजी रॉय व त्याचा सहकारी अरुण प्रकाश शेट्टी (सध्या फरार) यांनी पीडित महिला व तिच्या नवजात मुलाला अज्ञात ठिकाणी हलवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडिता पळून जाण्यात यशस्वी ठरली आणि तिने कालिम्पोंग महिला पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या आधारे, अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट कालिम्पोंगचे प्रभारी अधिकारी एलएसआय शांती लामा यांच्या नेतृत्वाखाली पथक गोव्यात दाखल झाले. ओल्ड गोवा पोलिसांच्या समन्वयातून त्यांनी आरोपीवर लक्ष ठेवले आणि त्याला यशस्वीरित्या अटक करण्यात आली.

पिंकू रॉय याच्यावर भारतीय न्याय संहिता च्या कलम ८५, १२७(२), १४३(२), ६२ आणि ६१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, कालिम्पोंग महिला पोलीस स्टेशन गुन्हा क्रमांक १३/२०२४ नोंदवण्यात आला आहे.

रॉय याला मेरशी येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी यांच्या समोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला सात दिवसांच्या ट्रान्झिट कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग युनिट कालिम्पोंगचे पथक पुढील तपासासाठी त्याला पश्चिम बंगालला घेऊन जाणार आहे.

### मौलाना फजल-उर रहमान यांच्या घोषणेमुळे पाकिस्तानात खळबळ

**नवी दिल्ली, दि. १:** गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानात अशांतता आहे. भारताने केलेल्या हल्ल्यांमुळे पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे, तसेच पाकिस्तानात अंतर्गत कलह देखील सुरु आहे. अनेकदा बलूच लिबरेशन आर्मीने पाकच्या सैन्यावर हल्ले केले आहेत. त्यानंतर आता जमियत–उलेमा–ए–इस्लाम पाकिस्तानचे प्रमुख मौलाना फजल–उर रहमान यांनी शाहबाज शरीफ सरकारला मोठा इशारा दिला आहे. एका आठवड्यात आमचे लोक इस्लामाबाद ताब्यात घेतील असं मौलाना फजल–उर रहमान यांनी म्हटलं आहे.

बट्टाग्राम येथील एका रॅलीत बोलताना मौलाना फजल–उर रहमान यांनी म्हटले की, आमच्या लोकांवर अत्याचार होत आहेत, जे योग्य नाही. सरकारला आमची ताकद माहित नाही. आमचे लोक एका आठवड्यात इस्लामाबाद ताब्यात घेऊ शकतात. यापूर्वी आम्ही सरकारचा पाया हादरवला होता.’

पुढे बोलताना, फजल उर रहमान यांनी म्हटले की, हे सरकार बेकायदेशीर आहे. २०२४ च्या निवडणुका फसव्या पद्धतीने घेण्यात आल्या. जे सत्तेत आहेत ते सर्व फसव्या पद्धतीने निवडून आले आहेत.२०१८ मध्येही सार्वत्रिक निवडणुका लवकर झाल्या होत्या. त्यावेळीही एक बनावट सरकार आले होते, जे आम्ही उखडून टाकले. या सरकारने त्यातून धडा शिकायला हवा.

मौलाना म्हणाले की, सध्याचे सरकार आमच्या पक्षात भांडण लावू इच्छित आहे. आम्ही राष्ट्रीय एकतेच्या मुद्द्यावर आवाज उठवत आहोत, परंतु जर गरज पडली तर आम्ही पाकिस्तानात जिहाद सुरू करू. हे सरकार आता फार काळ टिकणार नाही.


# सुर्ला पठारावरील रिसॉर्ट प्रकल्पाला उच्च न्यायालयाची नोटीस

## वन्यजीव क्षेत्रात वसणूक; गोवा सरकार, पर्यावरण मंत्रालयाकडून खुलासा मागवला

■ टीम दैनिक हेराल्ड :


**पणजी, दि. १ : म्हादई वन्यजीव अभयारण्य क्षेत्रातील सुर्ला पठारावर उभारण्यात येणाऱ्या वादग्रस्त पर्यटन रिसॉर्टविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने राज्य सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय तसेच इतर संबंधित प्राधिकरणांना नोटीस बजावली आहे.**

ही याचिका गोवा फाउंडेशनचे क्लॉड अल्वारेस यांनी दाखल केली आहे. त्यांनी केलेल्या याचिकेनुसार, गोवा पर्यटन विकास महामंडळ व गोवा वन विकास महामंडळ यांनी खासगी खाण कंपनी फोमेंतो रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड’च्या रिसॉर्ट प्रकल्पाला मंजुरी दिली असून यासाठी प्रशासनाने कार्य आदेशही जारी केले आहेत. विशेष म्हणजे, हे सर्व आदेश आणि परवानग्या न्यायालयाच्या याआधीच्या निर्देशांचे उल्लंघन करत देण्यात आल्याचा आरोप याचिकेत आहे. पान २ ▶



### याचिकेतील महत्त्वाचे मुद्दे

- रिसॉर्ट क्षेत्र प्रस्तावित व्याघ्र अभयारण्याच्या मुख्य भागातच
- न्यायालयाच्या आदेशांची अवहेलना करून परवानग्या जारी
- जैवविविधतेने समृद्ध असलेल्या जंगल परिसरात व्यवसायिक अतिक्रमणाचा आरोप
- वन्यजीव संरक्षण कायदा आणि वन संरक्षण कायद्याच्या स्पष्ट उल्लंघनाचा मुद्दा




# मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना ऊत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या दिल्लीत नुकत्याच झालेल्या दौऱ्यानंतर राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना पुन्हा एकदा चालना मिळाली आहे. विशेषतः कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांचे नाव या चर्चांमध्ये आघाडीवर आहे. मात्र, संभाव्य फेरबदल पावसाळी अधिवेशनानंतरच होण्याची शक्यता अधिक आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

गोवा विधानसभेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होणार असून ८ ऑगस्टपर्यंत चालेल. त्यामुळे त्याआधी कोणताही मोठा निर्णय घेतला जाण्याची शक्यता कमी मानली जात आहे.

दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या बैठकीनंतर गोव्यात परतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मंत्रिमंडळ बदलाबाबत स्पष्ट उत्तर देण्याचे टाळले. सध्या काही सांगता येणार नाही. योग्य वेळी कळवू, असे सूचक वक्तव्य त्यांनी केले.

दरम्यान, मुख्यमंत्री सावंत आणि आमदार मायकल लोबो यांनी सोमवारी संध्याकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीमुळे लोबो यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान मिळणार का, याबाबत चर्चा रंगली आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी या भेटीबाबत बोलताना सांगितले की , मायकल लोबो हे माझे जुने मित्र असून भाजपमधील वरिष्ठ नेते आहेत. आम्ही केंद्रीय गृहमंत्र्यांशी विविध राजकीय विषयांवर चर्चा केली.

तथापि, लोबो यांनी अद्याप कोणत्याही तात्काळ फेरबदलाच्या शक्यतेला नकार दिला आहे. माझा मंत्रिमंडळात समावेश किंवा इतर कोणताही बदल हा भाजप हायकमांड, मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष यांच्या निर्णयावर अवलंबून आहे. मला वाटते पावसाळी अधिवेशनानंतरच काही होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

लोबो यांनी सांगितले की ही बैठक बराच वेळ प्रलंबित होती आणि गोव्यातील राजकीय पुढील दिशा यावर ती केंद्रित होती. अमित शहा यांनी मला सहा महिन्यांपूर्वीच भेटण्यास सांगितले होते. अखेर ही भेट झाली आणि आम्ही सुमारे १५ मिनिटे चर्चा केली. शहा हे गोव्यातील घडामोडी बारकाईने पाहत आहेत, असे त्यांनी सांगितले.

मंत्रिमंडळात पुनःप्रवेशाच्या शक्यतेबाबत विचारले असता लोबो म्हणाले, असे कोणतेही आश्वासन देण्यात आलेले नाही. हा निर्णय पक्षाचा आहे आणि योग्य वेळी राष्ट्रीय नेतृत्व, मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष मिळूनच तो घेतील.

सध्या मंत्रिमंडळात एक पद रिक्त असले तरी ते पद भरले जाईल की नाही, याबाबतही त्यांनी अनभिज्ञता दर्शवली. विधानसभेच्या अधिवेशनाआधी काही होण्याची शक्यता नाही. काही निर्णय झाला, तर तो नंतरच होईल, असे त्यांनी नमूद केले.


लोबो यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की त्यांनी कोणतीही अट न घालता भाजपमध्ये प्रवेश केला होता आणि देशभरातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवणाऱ्या पक्षाचा भाग असल्याचा त्यांना अभिमान वाटतो. इतक्या छोट्या राज्याकडेही अमित शहांसारखे नेते लक्ष ठेवतात, हे जाणवून आत्मविश्वास वाटतो, असे ते म्हणाले.

# भाज्यांची आयात २५% ने घटली –मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोव्यातील कृषी क्षेत्राने गेल्या काही वर्षांत लक्षणीय प्रगती केली असून, राज्याने भाज्यांच्या आयातीवरील अवलंबित्व २५ टक्क्यांनी कमी केले आहे, तसेच उत्पादनातील जवळपास १० टक्के भाज्या निर्यात करण्यास सुरुवात केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली.

गोवा राज्य उपजीविका अभियानातर्फे आयोजित राज्यस्तरीय बँकर्स कॉन्क्लेव्हमध्ये बोलताना मुख्यमंत्री सावंत यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पूर्वी गोवा राज्य भाज्या व फुले १०० टक्के आयात करत होते. मात्र आता २५ टक्क्यांची आयात कमी झाली असून, राज्यात उत्पादित झालेल्या भाज्यांपैकी सुमारे १० टक्के निर्यात केल्या जात आहेत.



मुख्यमंत्री सावंत यांनी यशाचे श्रेय आत्मनिर्भर भारत’ मोहिमेसह स्वयंपूर्ण गोवा’ उपक्रमाअंतर्गत राज्यात राबवण्यात आलेल्या कृषी धोरणांना दिले. फलोत्पादन महामंडळ शेतकऱ्यांकडून थेट उत्पादन खरेदी करते आणि ती उत्पादने गोव्यातील बागायती दुकानांतून विकली जातात. हे मॉडेल अन्य राज्यांत फारसे आढळत नाही, असे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्र्यांनी विशेषत: महिलांच्या सहभागाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, फुलशेती, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन आणि मत्स्यपालन क्षेत्रात महिलांचे योगदान सातत्याने वाढत आहे. पूर्वी आयातीवर अवलंबून असलेल्या क्षेत्रांमध्ये आता महिलांचे नेतृत्व असलेल्या उत्पादन केंद्रांची भर पडली आहे, असे ते म्हणाले.

सावंत यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावरही भर दिला. राज्य महिला शेतकऱ्यांना ड्रोनसारख्या नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मदत करत आहे. काही काळापूर्वीपर्यंत गोव्यातील शेती उत्पादन घटत असल्याची टीका होत होती, मात्र आता नवोपक्रम आणि महिलांच्या प्रयत्नांमुळे उत्पादन सातत्याने वाढत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी बँक प्रतिनिधींना उद्देशून शेती व संलग्न क्षेत्रांत गुंतलेल्या स्वयं–सहायता गटांना आणि लघुउद्योजकांना सर्वतोपरी सहाय्य देण्याचे आवाहन केले. ग्रामीण शेती क्षेत्रात – विशेषतः पर्यटनाशी संबंधित उत्पादन व सेवांमध्ये मोठी वाढीची क्षमता आहे. त्यासाठी वित्तीय संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# इराणच्या फोर्डो अणुऊर्जा केंद्रात हालचालींना वेग

## उपग्रह चित्रांमधून नवीन गोष्टी उघड | उत्खनन यंत्रे, क्रेन्स, ट्रक्स आणि बुलडोझर्स सक्रिय असल्याचे चित्र

**नवी दिल्ली, दि. १ :**

इराणच्या फोर्डो अणुसुविधेवर मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू असल्याचे मॅक्सार टेक्नॉलॉजीजच्या २९ जूनच्या उपग्रह प्रतिमांमधून समोर आले आहे. अमेरिकेच्या अलीकडील हवाई हल्ल्यांनंतर या केंद्रातील हालचालींना वेग आला असून, विविध यंत्रसामग्री, उत्खनन यंत्रे, क्रेन्स, ट्रक्स आणि बुलडोझर्स परिसरात सक्रिय असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

फोर्डो हे अणुसंवर्धन केंद्र अमेरिका व इस्रायलने २२ जून रोजी केलेल्या संयुक्त हल्ल्यांत लक्ष्य केले होते. उपग्रह प्रतिमांमध्ये संकुलाच्या पूर्वेकडील भागात जेथील प्रवेशद्वार आणि इमारती हल्ल्यांत बाधित झाल्या सध्या मोठ्या प्रमाणावर पुनर्बांधणी सुरू असल्याचे दिसत आहे.

अण्वस्त्र तज्ज्ञ डेव्हिड अल्ब्राइट यांच्या मतानुसार, सद्य घडामोडी नुकसानीच्या मूल्यांकनासाठी किंवा रेडिओलॉजिकल सॅम्पलिंगसाठी असू शकतात. त्यांनी २८ जून रोजी घेतलेल्या प्रतिमांमधून बांधकामात खड्डे भरणे अथवा स्थान पुनर्स्थापनेचा भाग असल्याचा अंदाज व्यक्त केला.

इस्रायलने १३ जून रोजी इराणच्या अणु व लष्करी स्थळांवर हल्ले करून काही वैज्ञानिक व कमांडरना ठार केले होते. त्यानंतर १२ दिवस चाललेल्या संघर्षात इराणने इस्रायलवर पलटवार केला. अमेरिकेनेही या संघर्षात उघड सहभाग घेत फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान येथील प्रमुख अणुऊर्जा केंद्रांवर बॉम्बहल्ले केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हल्ल्यांनंतर जाहीर केले की, या मोहिमेद्वारे इराणची प्रमुख अणुसंवर्धन केंद्रे उद्ध्वस्त झाली आहेत. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले की, बी –२ स्टेल्थ बॉम्बर्स आणि बंकर बस्टरया कारवाईत वापरण्यात आल्या. त्यांनी या मोहिमेला २००१ नंतरचे सर्वात दीर्घ बी –२ मिशन असल्याचे म्हटले.

जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफचे अध्यक्ष जनरल डॅन केन यांनी खुलासा केला की ऑपरेशन मिडनाईट हॅमर’मध्ये १२५ अमेरिकन लढाऊ विमाने सहभागी होती, ज्यात ७ बी –२ बॉम्बर्स आणि १४ एमओपी चा समावेश होता.

अमेरिकेच्या दाव्यांना उत्तर देताना इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांनी २६ जून रोजी दूरचित्रवाणी संदेशात म्हटले की, अमेरिकेने अणुस्थळांवर हल्ले केले खरे, पण त्यातून काहीही साध्य झाले नाही. ट्रम्प अतिशयोक्ती करत आहेत.

दरम्यान, २४ जून रोजी अमेरिकेने युद्धबंदीवर सहमती दर्शविल्याचे सांगितले असले तरी, इराणने त्याचा स्पष्ट इन्कार केला आहे.

